प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १९.०३.२०२०**

# कोरोना विषाणूचा प्रसार व लागण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांचे जिम, उद्याने व जलतरण तलाव बंद ठेवण्याचे सिडकोचे निर्देश

सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण मुंबई व नवी मुंबईसह राज्यातील काही भागात झाली असून सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनातर्फे विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नवी मुंबई येथील सहकारी गृहनिर्माण संस्थांचे जिम, उद्याने व जलतरण तलाव पुढील सूचनेपर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश सिडकोतर्फे सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सर्व गृहनिर्माण संस्थांमध्ये कोणत्याही कार्यक्रमानिमित्त मोठी गर्दी होणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देशदेखील सिडकोतर्फे देण्यात आले आहेत.

कोरोना विषाणूचा संसर्ग, प्रसार व लागण गर्दीच्या ठिकाणी जास्त होते. गृहनिर्माण संस्थांच्या जिम, उद्याने व जलतरण तलावाच्या ठिकाणी अशाच प्रकारे गर्दी अथवा लोकांचा समूह निर्माण होऊन त्याद्वारे संसर्ग, प्रसार अथवा लागण होण्याची मोठ्या प्रमाणावर शक्यता असल्याने पुढील सूचनेपर्यंत नवी मुंबईतील गृहनिर्माण संस्थांना त्यांचे जिम, उद्याने व जलतरण तलाव बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कोरोना विषाणूची लागण म्हणजेच **COVID-19** या रोगाला पॅनडेमीक (जगभरात पसरलेला साथीचा रोग) घोषित करण्यात आले असून ही एक प्रकारची राष्ट्रीय आपत्तीच आहे. त्यामुळे सिडकोतर्फे नवी मुंबई येथील सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्यात आलेल्या वरिल निर्देशांचे त्यांनी काटेकोर पालन करून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन सदर संस्थांना करण्यात येत आहे. त्याच बरोबर नवी मुंबईतील सर्व नागरिकांनादेखील आवाहन करण्यात येते की त्यांनी सार्वजनिक व गर्दीच्या ठिकाणी जाण्याचे कटाक्षाने टाळावे. आपणा सर्वांच्या सहकार्यातूनच या राष्ट्रीय आपत्तीचा सामना करणे शक्य होणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**